दैनिक www.esuryodaylive.com Email : suryodaykokan.123@gmail.com

महाराष्ट्र

# सूर्योदय

मुख्य संपादक : गंगाधर काळकुटे अनुप फंड (आवृत्ती संपादक), निखिल गोळे (आवृत्ती सहसंपादक),नयनिश गोळे (आवृत्ती कार्यकारी संपादक)




मुंबई ॥ वर्ष २ रे ॥ अंक २३९ ॥ बुधवार १४ ऑगस्ट २०२४ ॥ RNI No.MAHMAR/2014/54581 ॥ Postal Regd No.L/74/RNP/Beed/2019-21 ॥ पाने ४ किंमत २ रुपये ॥

## जव्हार तालुक्यातील कु-रुपेश गंगाराम भसरा सोलापूर पोलीस कॉन्स्टेबलमध्ये निवड...

पालघर : दिनेश आंबेकर

जव्हार : जव्हार तालुक्यातील आकरे पैकी कहांडोळपाडा पोस्ट कऱ्हे ता - जव्हार जि- पालघर येथील रहिवासी असून त्यांनी त्याच्या मेहनतीने आज त्यांनी जव्हार तालुक्याचे नाव रोशन केले आहे.त्याचे प्राथमिक माध्यमिक शिक्षण देहरे आश्रम शाळेमध्ये झालेले आहे,

त्यानंतर अकरावी बारावी हे कॉलेज गोखले एज्युकेशन सोसायटी जव्हार येथे पूर्ण केले आहे.नंतर त्याने त्याच्या मेहनतीनुसार निर्णय घेतला होता,की मला पोलीस लाईन ला जायचं आहे,ही त्याची इच्छा होती.

परंतु त्याची घरची परिस्थिती बिकट असल्यामुळे त्याला ते दोन ते अडीच वर्ष सराव करावा लागला आहे.तसेच त्याला कोणाची साथ नसल्यामुळे तो एकटाच पडला होता

.कोणी त्याला शिकवणारा नव्हता, म्हणून तो निलेश सांबरे साहेबांच्या जिजाऊ शैक्षणिक व सामाजिक संस्था झडपोली यांच्या पाठबळ जिजाऊ पोलीस सैन्य भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्रामध्ये त्याने ऍडमिसन घेतले,

त्याने दोन -अडीच वर्ष मेहनत करून आज त्यांनी आदिवासी मधून १८५ गुण मिळवून तो १० सीट साठी तो नं-१ सर्वात टॉपर मध्ये आला आहे,आणी तो सोलापूर राज्य राखीव पोलीस बल मध्ये त्याची निवड झाली आहे.त्याच्या पोलिस अकॅडमी झडपोली येथे रंग गुलाल उधळून त्याचा सत्कार करण्यात आला. तसेच ग्रामपंचायत आकरे मध्ये त्यांचे शुभेच्छांचे वर्षाव होत आहे ,आणि त्याला पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

## आपत्तीच्या घटना प्रसारीत करताना तारीख आणि वेळ आवश्यक

नवी दिल्ली : नैसर्गिक आपत्ती आणि मोठ्या अपघातांची माहिती देताना वृत्तवाहिन्यांनी घटनेची तारीख आणि वेळ लिहिणे आवश्यक आहे. केंद्र सरकारने खासगी वृत्तवाहिन्यांसाठी याबाबतचा सल्ला दिला आहे.केंद्र सरकारने खासगी वृत्तवाहिन्यांसाठी एक सल्ला दिला असून ज्यामध्ये नैसर्गिक आपत्ती आणि मोठ्या अपघातांची माहिती देताना घटनेची तारीख आणि वेळ लिहिणे आवश्यक असल्याचे म्हटले आहे. माहिती आणि प्रसारण मंत्रालयाने याबाबतची माहिती दिली आहे. अपघात किंवा आपत्तीनंतर काही दिवसांनी टेलिव्हिजन चॅनेलवर दाखवले जाणारे फुटेज वास्तविक-वेळची परिस्थिती दर्शवू शकत नाही. त्यामुळे घटनास्थळांवर तारीख आणि वेळ लिहिणे आवश्यक असल्याचे माहिती आणि प्रसारण मंत्रालयाने म्हटले आहे.

प्रेषकांमध्ये कोणत्याही प्रकारचे गैरसमज होऊ नये म्हणून सर्व खासगी टीव्ही चॅनेलना नैसर्गिक आपत्ती किंवा मोठ्या अपघातांच्या दृश्यांमध्ये




तारीख आणि वेळ फुटेजच्या शीर्षस्थानी प्रदर्शित करणे आवश्यक आहे. याची खात्री करण्यास सांगितले आहे. वृत्तवाहिन्या नैसर्गिक आपत्ती आणि मोठ्या अपघातांचे अनेक दिवस सतत कव्हरेज करत असतात. मात्र, घटनेच्या दिवसापासूनचे फुटेज दाखवत राहतात. मंत्रालयाने असा युक्तिवाद केला की अपघात किंवा आपत्तीनंतर अनेक दिवसांनी टेलिव्हिजन चॅनेलद्वारे दर्शवल्या जाणाऱ्या फुटेजमध्ये वास्तविक वेळेची परिस्थिती प्रतिबिंबीत होत नाही. ज्यामुळे दर्शकांमध्ये अनावश्यक गोंधळ आणि संभाव्य दहशत निर्माण होते.नियमांचे पालन करण्यावर भर

अपघात किंवा आपत्तीनंतर अनेक दिवसांनी टेलिव्हिजन चॅनेलद्वारे दर्शविलेले फुटेज वास्तविक-वेळची परिस्थिती प्रतिबिंबित करत नाही. ज्यामुळे दर्शकांमध्ये गोंधळ आणि घबराट निर्माण होते. त्यामुळे त्यावेळची वास्तवीक वेळ दाखवणे गरजेचे असल्याचा सल्ला मंत्रालयाने दिला आहे. खासगी वृत्तवाहिन्यांनी अशा घटनांचे प्रसारण करताना नियमांचे पालन केले पाहिजे, याची खात्री करण्यावर भर देण्यात आला आहे. वायनाड, केरळ आणि हिमाचल प्रदेशमधील भूस्खलनाच्या व्यापक कव्हरेजच्या पार्श्वभूमीवर ही सूचना जारी करण्यात आली आहे. ज्यामध्ये अनेकांचा मृत्यू झाला होता.प्रेषकांची गफलत होऊ नये

अनेकदा मोठ्या नैसर्गिक घटना किंवा मोठे अपघात घडतात. अशा मोठ्या घटनांच्या बातम्या किंवा माहिती अनेकदा वृत्तवाहिन्यांवर प्रकाशीत केली जाते. मात्र, अनेकदा माहिती प्रकाशीत करताना ज्यावेळी घटना घडली. त्यावेळची तारीख आणि वेळ दिली जात नाही. यामुळे प्रेषकांची गफलत होण्याची शक्यता असते. कारण नेमकी घटना घडली कधी? यावरुन ते स्पष्ट होत नाही. त्यामुळे वृत्तवाहिन्यांनी आपत्तीच्या घटना देताना काळजी घेणे गरजेचे आहे. वेळ आणि तारीख देणे गरजेचे असल्याचा सल्ला सरकारने दिला आहे.

## नगराध्यक्षांचा कालावधी अडीचऐवजी ५ वर्षे; मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय

मुंबई : विधानसभा निवडणुकांच्या घोषणेपूर्वी कॅबिनेट बैठकीत अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले जात असून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली आज राज्य मंत्रिमंडळाची बैठक पार पडली. या बैठकीत ८ मोठे निर्णय घेण्यात आले असून मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा आढावादेखील घेण्यात आला आहे. तसेच, राज्यातील नगरपंचायत व नगरपालिकांमधील नगराध्यक्षांचा कालावधी आता २.५ ऐवजी ५ वर्षे करण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

दरम्यान,महाराष्ट्रात २२८ नगर परिषदा व नगरपंचायती आहेत. त्यांच्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये निवडून आलेल्या नगरसेवकांच्या पाच वर्षांच्या कालावधीपैकी अडीच-अडीच वर्षांचे असे दोन अध्यक्ष निवडण्याचे निश्चित करून पहिल्या टप्प्याच्या नगराध्यक्षपदासाठी घेण्यात आलेल्या आरक्षणाच्या सोडतीचा कार्यकाळ संपुष्टात येत आहे. त्यामुळे, आता दुसऱ्या टर्ममधील नगराध्यक्षांची निवड काही दिवसांवर येऊन ठेपली असता नगराध्यक्षांचा कालावधी अडीच वर्षावरून ५ वर्षांवर करण्यात आला आहे. त्यामुळे, नगराध्यक्षपदाची स्वप्ने पाहणाऱ्या नगरसेवकांची घोर निराशा झाली आहे.

राज्यात एकीकडे २ वर्षांपासून बहुतांश नगरपालिका, नगरपंचायत आणि महापालिकांमध्ये प्रशासन राज आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकाच न झाल्यामुळे येथील नगराध्यक्षपदाची खुर्ची रिकामी असून तो पदभारही प्रशासनाकडे आहे. त्यातच आता राज्यातील उर्वरित नगर पंचायतींमधील नगराध्यक्षांचा कालावधी अडीच ऐवजी ५ वर्षांचा करण्यात आला आहे. राज्यात अंदाजे १०५ नगर पंचायतच्या निवडणुका अडीच वर्षापूर्वी पार पडल्याने अडीच वर्षासाठी नगराध्यक्षपदावर विराजमान झाले. मात्र, या नगराध्यक्षांचा कालावधी ऑगस्ट महिन्यात संपुष्टात येणार आहे.

त्यामुळे नगराध्यक्षपदाची आरक्षण सोडत आतापर्यंत निघणे आवश्यक होते. आता, सरकारने अडीच वर्षांचा कालावधी थेट ५ वर्षांचा करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी दिली आहे. त्यामुळे, अडीच वर्षांनी नगराध्यक्षपदाचे स्वप्न पाहणाऱ्या उमेदवारांची मोठी निराशा झाली आहे. महाविकास आघाडीने घेतला होता निर्णय

दरम्यान, राज्यातील नगरपालिकांच्या नगराध्यक्षांची निवड थेट जनतेतून करण्याचा निर्णय गत महायुती सरकारने घेतला होता. त्यानंतर, महाविकास आघाडी सरकारने हा निर्णय बदलून नगराध्यक्षांची निवड सभागृहातील नगरसेवकांकडून करण्याचा निर्णय घेण्यात आला. सध्या, तो निर्णय लागू असून अडीच वर्षांसाठी नगराध्यक्षपदाची निवड होती, ती आता ५ वर्षे करण्यात आली आहे. राज्यातील जवळपास १०५ नगरपालिकांमध्ये पुढील काही दिवसांत नगराध्यक्ष बदलले जाणार होते.

## सन २०२३ च्या खरीप हंगामातील कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना अर्थसहाय्य

सोलापूर, दिनांक १२:- सन २०२३ च्या खरीप हंगामातील कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना अर्थसहाय्य देणे साठी महाराष्ट्र शासन कृषि विभाग मार्फत दि.२९ जुलै २०२४ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. या अर्थसहाय्याचे वितरण शेतकऱ्यांना सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणालीद्वारे शेतकऱ्यांच्या आधार लिंक बँक खात्यामध्ये थेट लाभ हस्तांतरणाच्या डीबीटी माध्यमातून होणार आहे. सोयाबीन

व कापूस उत्पादक शेतकऱ्यांना २ हेक्टरच्या मर्यादेत प्रती हेक्टर ५ हजार रूपयांचे अर्थसहाय्य देण्याची घोषणा शासनाने केली आहे. त्याची अंमलबजावणी सोलापूर जिल्ह्यामध्ये सुरू झालेली आहे. ज्या शेतकऱ्यांनी खरीप २०२३ मध्ये ई-पीक पाहणी द्वारे आपल्या पिकाची नोंद केलेली आहे, त्या शेतकऱ्यांना सदरचे अनुदान मिळणार आहे. अर्थसहाय्य आधार लिंक खात्यावर जमा करण्यासाठी सध्या शेतकऱ्यांची माहिती घेण्याचे काम कृषि विभागामार्फत सुरू आहे कृषि विभागामार्फत शेतकऱ्यांच्या याद्या प्रत्येक गावामध्ये ग्रामपंचायत स्तरावर तसेच विविध प्रसार माध्यमांवर प्रसिध्द करण्यात येत आहेत. या याद्यांमध्ये सोयाबीन व कापूर पिकांच्या वैयक्तिक व सामाजिक मालकी असलेल्या शेतकऱ्यांचया याद्यांचा समावेश आहे.

सोयाबीन व कापूस उत्पादक शेतकऱ्यांना लाभ किती मिळणार- ०.२ हेक्टर पेक्षा कमी क्षेत्रासाठी सरसकट १ हजार रूपये, ०.२ हेक्टर पेक्षा जास्त क्षेत्रासाठी त्यांच्या क्षेत्रानुसार प्रतिहेक्टर रूपये ५ हजार (२ हेक्टरच्या मर्यादेत म्हणजेच रू.१० हजार पर्यंत).शेतकऱ्यांनी काय करणे अपेक्षित आहे- शेतकऱ्यांनी कृषि विभागाच्या वतीने देण्यात आलेले संमती पत्र भरून देणे अपेक्षित आहे, आधार अधिनियम २०१६ नुसार आपल्या आधार क्रमांकाचा वापर ओळख पटवण्यासाठी आवश्यक आहे, संमती पत्रामध्ये आपले आधार वरील असलेले नाव, आधार क्रमांक, मोबाईल क्रमांक मराठी व इंग्रजी मध्ये देणे अपेक्षित आहे. चूक होऊ नये यासाठी या संमती पत्राबरोबर आपल्या आधारची झेरॉक्स कृषी सहायकांना देण्यात यावी, दिनांक १४ ऑगस्ट २०२४ पर्यंत शेतकरी बांधवांनी आपली माहिती आपल्या गावाचे कृषी सहाय्यक किंवा कृषी पर्यवेक्षक यांच्याकडे जमा करावी, ज्या क्षेत्रावर सामायिक खातेदार आहेत. त्यापैकी एकाच खातेदाराच्या आधार लिंक असलेल्या बँक खात्यावर अनुदान जमा होणार आहे. इतर खातेदारांची ना हरकत पत्र सोबत जोडणे अपेक्षित आहे.

त्यामुळे शेतकरी बांधवांनी सामायिक खातेदाराच्या बाबतीत ज्यांचे नावे अनुदान जमा करावयाचे आहे त्या एकाच खातेदाराचे नाव देऊन इतर खातेदारांनी ना हरकत प्रमाणपत्रावर सही करणे गरजेचे आहे. सदरचे संमती पत्र तसेच सामायिक खातेदारांचे ना हरकत पत्र शेतकऱ्यांनी आपल्या गावच्या कृषी सहायकांकडे जमा करावे. शेतकऱ्यांकडून प्राप्त झालेले संमती पत्र व ना हरकत पत्र तालुका कृषी अधिकारी कार्यालयामध्ये संकलित करून शासनाने महाआयटी कडून तयार केलेल्या वेब पोर्टलवर शंतकऱ्यांची माहिती भरली जाणार आहे. या पोर्टलच्या माध्यमातून वैयक्तिक व सामायिक खातेदारांच्या अनुदानाच्या अर्थसहाय्याची परिगणना करण्यात येणार आहे.

## देशभरातील डॉक्टरांचे कामबंद आंदोलन सुरूच

**नवी दिल्ली : कोलकात्यात घडलेल्या घटनेने संपूर्ण देश हादरला. सरकारी रुग्णालयातील निवासी डॉक्टरची बलात्कार करुन हत्या केल्याची संतापजनक घटना कोलकात्यात घडली. या घटनेच्या निषेधार्थ राज्यातील सर्व वैद्यकीय महाविद्यालयांतील निवासी डॉक्टर मंगळवार दि. १३ ऑगस्टपासून कोणतेही नियमित काम करणार नसल्याचे महाराष्ट्र असोसिएशन ऑफ रेसिडेंट डॉक्टर्स (मार्ड) संघटनेने निवेदनाद्वारे कळवले आहे. तसेच, या काळात अत्यावश्यक सेवा सुरूच असतील असेही मार्डच्या वतीने सांगण्यात आले आहे. या निर्णयामुळे रुग्णालयाच्या दैनंदिन कामावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.**

**फेडरेशन ऑफ ऑल इंडिया मेडिकल असोसिएशन (एफएआयएमए) ने मंगळवार दि. १३ ऑगस्टपासून देशव्यापी निषेध दर्शवण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी ओपीडी आणि वैकल्पिक सेवा बंद ठेवण्याचे आवाहन केले आहे. ९ ऑगस्ट रोजी कोलकाता येथील आरजी कर मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटलमध्ये एका महिला पदव्युत्तर प्रशिक्षणार्थी डॉक्टरवर बलात्कार करुन तिची हत्या करण्यात आली. याच निषेधार्थ आज देशभरातील डॉक्टरांनी बंद पुकारला आहे.**

**फेडरेशन ऑफ रेसिडेंट डॉक्टर्स असोसिएशन इंडिया या राष्ट्रीय पातळीवरील निवासी डॉक्टरांच्या संघटनेने सुद्धा सर्व निवासी डॉक्टरांना निवडक सेवा बंद करण्याचे आवाहन केले होते. त्यानंतर मुंबई महापालिकेच्या अखत्यारीतील निवासी डॉक्टर संघटनेने आणि राज्यातील सरकारी वैद्यकीय महाविद्यालयांशी संलग्न रुग्णालयांत काम**

**करणाऱ्या निवासी डॉक्टरांनी त्यांचा निर्णय जाहीर केला. हे काम बंद आंदोलन मागण्या पूर्ण होईपर्यंत असून अनिश्चित कालावधीसाठी असल्याचे सांगण्यात येत आहे. वैद्यकीय वर्तुळात कोलकाता येथील घटनेचा तीव्र शब्दांत निषेध व्यक्त केला जात आहे.**

**एफएआयएमए च्यावतीने ट्विटरवर ट्वीट करण्यात आले आहे की, आम्ही भारतभर आंदोलन करणाऱ्या डॉक्टरांच्या पाठीशी उभे आहोत! आम्ही देशभरातील डॉक्टरांना आजपासून या आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन करतो! आम्हाला न्याय हवा आहे. दरम्यान, इंडियन मेडिकल असोसिएशनने केंद्रीय आरोग्य मंत्री जेपी नड्डा यांना पत्र लिहून महिला डॉक्टरसोबत झालेल्या अत्याचाराच्या घटनेबाबत तातडीने कारवाई करण्याची विनंती केली आहे. दोषींना न्याय मिळवून देण्यासाठी या प्रकरणाची निष्पक्ष आणि सखोल चौकशी करण्याची मागणी आयएमएने केली आहे. तसेच, असा गुन्हा कोणत्या परिस्थितीत घडला, याची सखोल चौकशी करण्याची मागणी असोसिएशनने केली आहे. त्याचप्रमाणे, कामाच्या ठिकाणी डॉक्टरांची, विशेषत: महिलांची सुरक्षा वाढवण्यासाठी पावले उचलावीत, अशी मागणीही आयएमएच्या वतीनं करण्यात आली आहे. नेमके काय घडले? शुक्रवारी हॉस्पिटलच्या सेमिनार हॉलमध्ये एका महिला डॉक्टरचा मृतदेह आढळल्यानंतर कोलकातामध्ये खळबळ उडाली आहे**

संपादकीय

## दुर्घटना

केरळच्या वायनाड जिल्ह्यात नैसर्गिक आपत्ती काही नवीन नाही. गेल्या काही वर्षांत केवळ भारतातच नव्हे, तर संपूर्ण जगात अशांतता निर्माण झाली आहे. पृथ्वीवर कुठे तरी पूर, भूकंप, त्सुनामी किंवा महामारीच्या उद्रेकाबद्दल आपण दररोज ऐकतो. या नैसर्गिक आपत्तींमुळे केवळ मानवच नाही तर पृथ्वीवरील सर्व सजीवांना जगणे कठीण होत आहे. विकासाच्या नावाखाली मानव आपल्या मूर्खपणामुळे आणि पर्यावरण विषयीच्या असंवेदनशीलतेमुळे आपला जीव धोक्यात घालत आहे, असे म्हणता येईल. आपल्या भावी पिढ्यांना सर्वात गंभीर धोक्याचा सामना करावा लागणार आहे.

वायनाड हा एक डोंगराळ जिल्हा आहे, जो पश्चिम घाटाखाली येतो. २९ जुलै रोजी रात्री उशिरा येथे अनपेक्षितपणे मुसळधार पाऊस झाला, ज्याचे मोजमाप ३४ सें.मी. त्यामुळे पुरामुळे इरुवाझिंजीपुझा नदीवर मुंडक्काई ते चुरलमळा दरम्यान बांधलेला पूल कोसळून दरड कोसळली. अचानक मोठ्या आवाजाने खडक आणि जमीन बुडू लागली आणि ढिगारा खाली पडू लागला. मुंडक्काई, चुरामाला, अट्टामाला आणि नूलपुझा या भागांना त्याचा फटका बसला. घरे, पूल, रस्ते, वाहने वाहून गेली. मोठ्या संख्येने लोक मरण पावले आणि अनेक बेपत्ता आहेत. केरळ फॉरेस्ट रिसर्च इन्स्टिट्यूटचे शास्त्रज्ञ डॉ. टी. व्ही. संजीव नकाशाच्या मदतीने स्पष्ट करतात, ''या जिल्ह्याला अतिशय संवेदनशील ठिकाण म्हणून वर्गीकृत करण्यात आले आहे. असे असूनही, हे चुरमला शहरापासून ४.५६ किमी आणि मुंडक्काई शहरापासून ५.९ किमी अंतरावर आहे. या परिसरात मोठ्या प्रमाणावर खाणकाम होत आहे, त्यामुळे या भागातील वनस्पती अतिशय संवेदनशील आहेत. डॉ. टी. व्ही. संजीव पुढे सांगतात, ''काही वर्षांपूर्वी केरळ सरकारने बनवलेला नवीन कायदा वृक्षारोपणाचा काही भाग इतर कामांसाठी वापरण्याची परवानगी देतो परिणामी, रबर बागायतदारांचे लक्ष पर्यटन क्षेत्राकडे वाढले. कारण दरवर्षी परदेशी पर्यटकांसह २५ हजार पर्यटक येथे येतात, त्यांना राहण्यासाठी मोठमोठ्या इमारती बांधून ओबडधोबड जमीन देण्यात आली होती.

वायनाडमधील घटत्या जंगलांवरील २०२२ च्या अभ्यासातून असे दिसून आले आहे की, १९५० ते २०१८ दरम्यान जिल्ह्याचे ६२ टक्के हिरवे आच्छादन नाहीसे झाले आहे, तर लागवड क्षेत्रात जवळपास १८०० टक्क्यांनी वाढ झाली आहे. इंटरनॅशनल जर्नल ऑफ एन्व्हायर्नमेंटल रिसर्च अँड पब्लिक हेल्थमध्ये प्रकाशित झालेल्या अभ्यासानुसार १९५० पर्यंत वायनाडच्या एकूण क्षेत्रफळाच्या ८५ टक्के भाग जंगलाखाली होता. आता हा परिसर रबर लागवडीसाठी ओळखला जातो. रबराच्या झाडांमुळे भूस्खलनाची तीव्रता वाढली, जी लागवडपूर्व काळातील घनदाट जंगल क्षेत्राच्या तुलनेत माती धरून ठेवण्यासाठी कमी प्रभावी आहेत. संवेदनशील भागात अविचारी बांधकामे देशभरात, विशेषतः डोंगराळ आणि डोंगराळ भागात अशा आपत्तींना आमंत्रण देत आहेत. तज्ज्ञांनी ठळकपणे सांगितले आहे की, केरळमधील रस्ते आणि कल्व्हर्टच्या विस्तृत बांधकामाने सध्याच्या पावसाचे स्वरूप आणि तीव्रता विचारात घेतलेली नाही, परंतु जुन्या आकडेवारीवर अवलंबून आहे. फ्लॅश पूर टाळण्यासाठी बांधकामामध्ये नवीन जोखीम घटकांचा विचार करणे आवश्यक आहे, कारण अनेक संरचना नदीच्या प्रवाहाला सामावून घेण्यास अपयशी ठरतात, ज्यामुळे लक्षणीय विनाश होतो. अवैज्ञानिक बांधकाम पद्धती हे सध्याच्या विनाशाचे प्रमुख कारण आहे.

इस्रोचे माजी प्रमुख डॉ. के कस्तुरीरंगन यांच्या नेतृत्वाखालील इस्रोच्या उच्चस्तरीय कार्यगटाने आपल्या एका अहवालात देशातील ३१ जिल्हे भूस्खलनामुळे सर्वाधिक प्रभावित झाल्याचे घोषित केले होते. त्यात वायनाडचेही नाव होते. पर्यावरण तज्ज्ञ माधव गाडगीळ यांच्या अध्यक्षतेखालील पश्चिम घाट इकोलॉजी एक्स्पर्ट पॅनलने ज्या ठिकाणी अपघात झाला ते ठिकाण अतिसंवेदनशील म्हणून घोषित केले होते. मात्र राज्य सरकारने माधव गाडगीळ पॅनेलच्या सूचनेकडे दुर्लक्ष केले. वायनाड हे एकेकाळी हिरव्यागार पश्चिम घाटातील एक रमणीय हिल स्टेशन होते, जे त्याच्या विस्तीर्ण चहाच्या मळ्यांसाठी ओळखले जाते. बाहेरून येणाऱ्यांचे नेहमीच लोकांच्या जिव्हाळ्याने आणि उत्साहाने स्वागत होत असे. वायनाड हे काबिनी आणि चालियार सारख्या नद्यांचे मूळ ठिकाण आहे. घनदाट जंगले आणि पर्वत हे या जिल्ह्याचे सौंदर्य होते. हे विविध जैविक अभयारण्ये, वन्यजीव अभयारण्ये आणि राष्ट्रीय उद्याने यांचेही घर होते.सुमारे २२ हजार लोकसंख्या असलेली ४ गावे अवघ्या ४ तासांत भूस्खलनाने पूर्णपणे उद्ध्वस्त झाली. घरे ढिगाऱ्याखाली

# महाराष्ट्रातील अहिल्याभवन संपूर्ण देशात आदर्श ठरेल – कॅबिनेट मंत्री मंगल प्रभात लोढा

मुंबई, १२ ऑगस्ट: कॅबिनेट मंत्री आणि मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री मंगल प्रभात लोढा यांनी आंतरराष्ट्रीय दर्जाचे आणि भारतातील पहिले 'अहिल्या भवन' मानखुर्द येथे उभारले जाणार असल्याची घोषणा आज केली. जिल्हा नियोजन समिती निधीच्या माध्यमातून अहिल्या भवन उभारण्यात येणार असून, त्यासाठी ४७ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे. तसेच ३५,५०० स्क्वेअर मीटर इतक्या परिसरात हे भवन उभारले जाणार आहे. या अहिल्या भवनामध्ये मुंबई उपनगरातील महिला आणि बालविकास विभागाची विविध कार्यालये एकाच छताखाली येणार आहेत.

चेंबूर एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमातून पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या स्मृतिदिनानिमित्ताने चेंबूर येथील फाईन आर्ट्स सोसायटी येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्या ठिकाणी मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी याबाबत घोषणा केली.


पत्रकारांशी बोलताना मंत्री लोढा म्हणाले, ''आज भारतात प्रथमच आंतरराष्ट्रीय दर्जाचे अहिल्या भवन उभारले जाणार आहे. महिला आणि बालकांच्या विकासासाठी शासनाची कटिबद्धता दर्शवणारे हे भवन फक्त राज्यातच नव्हे, तर देशात आदर्श ठरेल. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचा आदर्श आज संपूर्ण महाराष्ट्रासमोर आहे. त्यांची शिकवण जपण्यासाठी, त्यांच्या कार्याला आदरांजली



देण्यासाठी हा आमचा छोटासा प्रयत्न आहे. राज्यातील महिला आणि बालकांच्या सुरक्षेसाठी, त्यांच्या सबलीकरणासाठी अहिल्या भवनाच्या माध्यमातून अतिशय महत्वाचे कार्य केले जाईल हा विश्वास आहे.'' ङ्गङ्गयेथे संकटात अडकलेल्या, हिंसाचाराचे बळी ठरलेल्या महिलांना मानसिक व कायदेविषयक समुपदेशन करण्यासाठी कार्यरत असलेल्या समुपदेशन केंद्रांच्या योजनेचे अद्ययावत समुपदेशन केंद्र या इमारतीत कार्यरत होईल. याद्वारे पीडित महिलांना आवश्यक ते समुपदेशन करून, त्यांचे पुनर्वसन करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. सोबतच महिलांना विविध कायदे, योजना व विकासाच्या दृष्टिकोनातून आवश्यक असलेले विविध प्रकारचे प्रशिक्षण देण्यासाठी २०० व्यक्तींची क्षमता असलेले अद्ययावत ऑडिटोरियम या संकुलात उभे राहणार आहे. त्याचबरोबर महिला व बालविकास विभागाच्या राज्यभरातील अधिकाऱ्यांना मुंबईत हक्काचे विश्रामगृह या संकुलात उभारण्यात येणार आहे. याशिवाय महिला व बालकांच्या विविध विकासात्मक चळवळीसाठी कार्यरत असणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना देखील या विश्रामगृहाचा लाभ घेता येणार आहे. या अहिल्या भवनाच्या परिसरात मुंबई उपनगर जिल्ह्यातील महिला व बालविकास विभागाअंतर्गत कार्यरत असलेले खालील कार्यालये असणार आहेत. १. बालविकास प्रकल्प अधिकारी (नागरी) यांचे एकूण २० कार्यालये या इमारतीत असतील. सद्यस्थितीत यातील बहुतांश कार्यालये मुंबईत भाड्याच्या इमारतीत आहेत. २. महिला आयोगाचे मुंबई विभागीय कार्यालय ३. बालहक्क आयोगाचे मुंबई विभागाचे कार्यालय ४. बालकल्याण समिती : मुंबई उपनगर जिल्ह्याचे क्षेत्रफळ व लोकसंख्या विचारात घेता, या जिल्ह्यात २ बालकल्याण समिती कार्यरत आहेत. काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांच्या बाबतीत या समितीला निर्णय घेण्याचे न्यायिक अधिकार असतात. त्यांचे अद्ययावत सुविधांनी सुसज्ज असलेले दोन स्वतंत्र कार्यालये या इमारतीत असतील. ५. बाल न्याय मंडळ : मुंबई उपनगर जिल्ह्यातील बालकांच्या वाढत्या गुन्ह्यांमधील समावेशाचे प्रमाण लक्षात घेता या जिल्ह्यात प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी यांच्या दोन बालन्याय मंडळाची निर्मिती करण्यात आली आहे. या इमारतीत या दोन्ही बालन्याय मंडळांसाठी अद्ययावत सुसज्ज असे कार्यालये असतील ६. महिला आर्थिक विकास महामंडळ यांचे मुंबई जिल्ह्याचे कार्यालय : बचतगटाच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणाची चळवळ यशस्वीपणे राबविणाऱ्या महिला आर्थिक विकास महामंडळाचे कार्यालय या इमारतीत असेल.

# १७ लाख राज्य सरकारी कर्मचारी बेमुदत संपावर जाणार! सर्वसामान्यांची कामे खोळंबणार

मुंबई : सोमवारी जर तुमचं एखाद्या सरकारी कार्यालयात काम असेल तर ही बातमी तुमच्यासाठी महत्त्वाची आहे. राज्यातील तब्बल १७ लाख राज्य सरकारी कर्मचाऱ्यांनी बेमुदत संपाची घोषणा केली आहे.राज्य सरकारी कर्मचारी संघटना कृती समितीची आज मुंबईत बैठक पार पडली. या बैठकीत राज्य सरकारी कर्मचाऱ्यांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. येत्या २९ ऑगस्टपासून बेमुदत संपावर जाण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला. राज्य सरकारी कर्मचारी संघटना कृती समितीचे मुख्य निमंत्रक विश्वास काटकर यांनी याबाबत माहिती दिली. राज्य सरकारी कर्मचाऱ्यांनी जुन्या पेन्शन प्रमाणे नवीन पेन्शन देण्याच्या मुद्द्यावर संप पुकारला आहे.२९ ऑगस्टपासून बेमुदत संपाचा निर्धार



मार्च २०२३ मध्ये राज्य शासनाने १७ लाख सरकारी कर्मचारी-शिक्षक यांच्या ७ दिवसांच्या संपात न भूतो न भविष्यती उद्रेक अनुभवला आहे. या प्रखर आंदोलनाचा सकारात्मक विचार करुन, राज्य शासनाने कर्मचारी शिक्षकांच्या समन्वय समितीसह दिर्घ चर्चा केली. त्यावेळी खुद्द मुख्यमंत्र्यांनी ''जुन्या पेन्शनप्रमाणे कर्मचारी-शिक्षकांना आर्थिक व सामाजिक सुरक्षा प्रदान करण्यात येईल'' अशी लेखी हमी दिली होती.

त्यानंतर डिसेंबर २०२३ पर्यंत त्याबाबत कोणतीच सकारात्मक प्रगतीशील कार्यवाही दिसून न आल्यामुळे कर्मचारी-शिक्षकांनी पुन्हा १४ डिसेंबर २०२३ पासून बेमुदत संपाची घोषणा केली. सदर संप आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनासह पुन्हा झालेल्या चर्चेनुसार तत्कालीन अर्थसंकल्पीय अधिवेशनात, ''सुधारित राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना'' जाहीर केली. परंतु पुन्हा ''येरे माझ्या मागल्या'' प्रमाणे आजपर्यंत शासनाने कोणत्याही स्वरुपात सुधारित पेन्शन संदर्भातील शासन निर्णय किंवा अधिसूचना अद्याप पारित केलेली नाही. त्यामुळे राज्यातील सुमारे साडेआठ लाख संबंधित कर्मचारी-शिक्षक संतप्त झाले आहेत. सुधारित पेन्शनच्या भवितव्याबाबत ते चिंतित झाले आहेत.

तसेच केंद्राप्रमाणे ग्रॅच्युईटी द्या, १२ वर्षानंतर सेवानिवृत्ती वेतन/अंशराशीकरण पुनर्स्थापना करा, केंद्राप्रमाणे १ नोव्हेंबर २००५ पूर्वी जाहिरात/अधिसूचनाव्दारे नियुक्ती प्रक्रिया सुरु झालेल्या कर्मचारी/शिक्षकांना १९८२ ची जुनी निवृत्ती वेतन योजना लागू करा, सेवानिवृत्तीचे वय ६० करा, विविध संवर्गातील रिक्त असलेली ४० टक्के पदे कायमस्वरुपी नियुक्तीव्दारे भरा, विना अट अनुकंपा तत्वावर नियुक्त्या द्या, कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमित करा, शैक्षणिक विभागातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी विशेष चर्चासत्र आयोजित करा, नवीन शिक्षण धोरणाचा पुनर्विचार करा, आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांना न्याय द्या अशा प्रलंबित मागण्यांबाबत मुख्य सचिव पातळीवर चर्चासत्र आयोजित करुन, शासन निर्णय पारित केले जातील असे निसंदिग्ध आश्वासन शासनातर्फे देण्यात आले होते. या आश्वासनाला वाटाण्याच्या अक्षता तर लावल्या नाहीत ना? अशी भावना राज्यातील कर्मचारी शिक्षकांच्या मनात उत्पन्न झाली आहे.एकंदरीत वरील परिस्थितीमुळे राज्यातील १७ लाख कर्मचारी-शिक्षक कमालीचे संतप्त आहेत. त्यामुळे गुरुवारी २९ ऑगस्ट २०२४ पासून बेमुदत संपावर जाण्याचा निर्णय राज्यस्तरीय समन्वय समितीच्या सभेत एकमुखाने घेण्यात आला आहे. कर्मचारी-शिक्षकांना दिलासा देणारी कार्यवाही करणे राज्य शासनाला सहज शक्य आहे. राजकीय इच्छाशक्ती दाखवून शासनाने आगामी तीव्र संघर्ष टाळावा, अशी अपेक्षा समन्वय समि

# ७०० कॅमेरे, १० हजारांहून अधिक पोलिस, शार्पशूटर; स्वातंत्र्यदिनी अशी असेल दिल्लीची सुरक्षा

दिल्लीत १५ ऑगस्टच्या तयारीला अंतिम स्वरूप देण्यात असून त्यासाठी कडक सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली आहे. दिल्ली पोलिसांनी या कार्यक्रमासाठी ३,००० वाहतूक पोलिस अधिकारी, १०,००० पोलिस कर्मचारी आणि ७०० कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित चेहरा ओळखणारे कॅमेरे तैनात करून सुरक्षा वाढवली आहे.

जाणून घेऊया सुरक्षेबाबत काय विशेष व्यवस्था करण्यात आली आहे,आयजीआय एअर पोर्ट, रेल्वे स्थानके, बस स्टँड, मॉल्स आणि बाजारपेठांसह विविध ठिकाणी अतिरिक्त पोलिस दल आणि निमलष्करी दल तैनात.वाहतूक नियंत्रणासाठी तीन हजारांहून अधिक वाहतूक पोलिस तैनात करण्यात येणार आहेत.राष्ट्रीय राजधानीतील प्रमुख जंक्शनवर आणि लाल किल्ल्याला सीमेला जोडणाऱ्या रस्त्यांवरही वाहतूक पोलिस तैनात केले जातील.लाल किल्ल्यावर अनेक पातळ्यांवर सुरक्षा व्यवस्था असणार आहे.



७०० -आधारित फेशियल रिकग्निशन सीसीटीव्ही कॅमेरे किल्ल्याच्या परिसरात बसवले जातील.पंतप्रधान नरेंद्र मोदी देशाला संबोधित करतील तेव्हा या मुघलकालीन किल्ल्यावर १०,००० हून अधिक सुरक्षा कर्मचारी तैनात केले जातील.

लाल किल्ल्यावरील कार्यक्रमाला हजेरी लावण्यासाठी येणाऱ्या लोकांची ओळख पडताळून पाहण्यासाठी पोलिस स्मार्टफोन आधारित ॲप्लिकेशन देखील वापरणार आहेत.पंतप्रधान आणि इतर व्हीव्हीआयपी पाहुण्यांच्या सुरक्षेसाठी स्नायपर, कमांडो, शार्पशूटर तैनात केले जातील.लाल किल्ल्यावर सुरक्षा व्यवस्थेसंदर्भात नुकत्याच झालेल्या बैठकीत ट्रम्प यांच्यावर अमेरिकेतील हल्ल्याची चर्चा झाली आणि दिल्लीचे पोलिस आयुक्त संजय अरोरा यांनी कडेकोट सुरक्षा व्यवस्था ठेवण्यावर भर दिला.दिल्ली पोलिसांनी शुक्रवारी च्या पुणे मॉड्यूलचा सदस्य असलेल्या एका वाँटेड दहशतवाद्याला अटक केली.हॉटेल, गेस्ट हाऊस, पार्किंग लॉट आणि रेस्टॉरंटची तपासणी केली जात असून भाडेकरू आणि नोकरांची पडताळणी केली जात आहे.

स्वातंत्र्य दिनानिमित्त कडेकोट सुरक्षा व्यवस्था

पीटीआयच्या वृत्तानुसार, पोलिस उपायुक्त (उत्तर) मनोज कुमार मीना यांनी सांगितले की, स्थानिक रहिवासी आणि मार्केट वेल्फेअर असोसिएशनसोबतही बैठका घेतल्या जात आहेत. डीसीपी पुढे म्हणाले की, १५ ऑगस्टच्या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी येणाऱ्या २०,००० ते २२,००० हून अधिक पाहुण्यांसाठी पोलिस विस्तृत सुरक्षा व्यवस्था करत आहेत. मेट्रोचे सर्व दरवाजे उघडे राहणार आहेत. २४ तास पायी गस्त, सामुदायिक जागरुकता आणि मॉक ड्रिलचेही आयोजन केले जात आहे.

# नागाव समुद्र किनाऱ्यावरील बंधाऱ्याचे अस्तित्व संपुष्टात ६ किलोमीटर चा बंधारा झाला उध्वस्त

**बंधाऱ्या अभावी उधानाचे पाणी लोकवस्तीत शिरून हाहाकार माजण्याची भीती**

**तत्कालीन मुख्यमंत्री बॅरिस्टर ए. आर. अंतुले यांच्या पुढाकाराने सबंध कोकण किनारपट्टीला मिळाले होते बंधारे**

**अंतुलेंच्या कारकिर्दीनंतर कोकणाला वाली कोण?**

**किनार पट्टीवरील भयभीत ग्रामस्थांचा सवाल**

पाली /बेणसे

(धम्मशील सावंत )

कोकणाला ७२० किलोमीटर लांबीचा विस्तृत आणि अथांग असा सागर किनारा लाभलाय. या सागर किनार पट्टीची सुरक्षा ही येथील बंधाऱ्यांवर अवलंबुन असते. याच उद्देशाने तत्कालीन मुख्यमंत्री बॅरिस्टर ए. आर. अंतुले यांच्या पुढाकाराने सबंध कोकण किनारपट्टीकडे विशेष लक्ष देत बंधारे निर्माण करण्यावर विशेष भर दिला होता. मात्र आजमितीस अनेक ठिकाणचे बंधारे नामशेष झाल्याची परिस्थिती दिसून येतेय.

अलिबाग तालुक्यातील नागाव समुद्र किनारपट्टी त्यापैकीच एक. याठिकाणी असलेला ६ किमी चा बंधारा पूर्णपणे उध्वस्त झालाय. दगड गोटे निखळून पडलेत. सुरु ची झाडें उन्मळून पडली आहेत. मातीची मोठी धूप झालीय. अशातच उधान आणि खवळलेल्या समुद्राला रोखण्याची क्षमता असलेले बंधारे नसल्याने हे पाणी सीमा ओलांडून लोकवस्तीकडे झेपावत आहे. त्यामुळे किनार पट्टीवरील नागरिक, रिसॉर्ट मालक, व्यवसायिक भयभीत झाले आहेत. बंधाऱ्यामुळे जमिनीची धूप थांबते, सागराचे अतिवेगवान प्रवाहाचे पाणी बंधाऱ्यावर धडकून शांत होते. तुफान वादळी वाऱ्यात, अति वृष्टीत देखील पाण्याच्या वेगवान प्रवाहाला रोखण्याचे काम बंधारा करतो. मात्र किनारपट्टीवर बंधारा नसेल तर जमिनीची धूप होते. सागराचे खारे पाणी सीमा ओलांडून लोकवस्तीत शिरते. येथील पिण्याच्या पाणी साठ्यात खारे क्षार मिसळून पाणी खारट होते. सुरुचे घनदाट बन उध्वस्त होतात. शिवाय समुद्र किनाऱ्यावरील हिरवळ देखील नष्ट होते. पर्यावरणाचा मोठ्या प्रमाणात ऱ्हास होतोय. निसर्ग सौन्दर्य देखील लुप्त होत आहे. असे असताना सरकार या महत्वपूर्ण समस्येकडे डोळे झाक करते. त्यामुळे येथील रहिवाशी आणि स्थानिकांनी संताप व्यक्त केला आहे. यावेळी डॉ सचिन राऊळ म्हणाले की सुप्रसिद्ध पर्यटन स्थळ म्हणून नावलौकिक मिळवलेल्या नागाव समुद्र किनाऱ्याची सुरक्षा ऐरणीवर आली आहे, कारण येथील बंधारा पूर्णपणे नामशेष झाला आहे. सागराच्या वेगवान प्रवाहाने बंधारे उध्वस्थ झाली आहेत. ४० ते ५० वर्षांपूर्वी ची झाडें उन्मळून पडत आहेत. रायगड जिल्ह्यातील अनेक समुद्र किनाऱ्या वरील बंधारे काही अशी सुस्थितीत आहेत, मात्र नागाव बंदर भुईसपाट झाले आहे, उधानाचे पाणी गावात शिरण्याची भीती वाढली आहे. कोणीही या समस्ये कडे लक्ष देत नाही. एखादी मोठी दुर्घटना घडण्यापूर्वी तत्पूर्वी उपाययोजना करण्याची खऱ्या अर्थाने गरज आहे. ङ्ङसरकारने लवकरात लवकर इथं मजबूत, टिकावू बंधारा बांधून जनतेला सुरक्षित ठेवण्याची भुमिका घ्यावी अशी मागणी डॉ राऊळ यांच्यासह असंख्य ग्रामस्थांनी केली.

# आरबीआयने ठोठावला २ बॅंकांसह ५ जणांना दंड

मुंबई : सर्व बँकांनी रिझर्व्ह बँकेच्या नियमांचे पालन करणे आवश्यक आहे. आरबीआयच्या नियमांचे उल्लंघन केल्याबद्दल आरबीआय कोणत्याही बँकेवर कारवाई करू शकते. गेल्या काही दिवसांपासून आरबीआय ॲक्शन मोडमध्ये आहे.

सोमवार दि. १२ ऑगस्ट रोजी आरबीआयने ५ मोठ्या कंपन्यांवर कारवाई केली आहे. या ५ कंपन्यांमध्ये २ बँका आणि ३ वित्त कंपन्यांचा समावेश आहे. आरबीआयने नियमांचे उल्लंघन केल्याबद्दल ही कारवाई केली आहे.आरबीआयने सीएसबी बँकेला १.८६ कोटी रुपयांचा दंड ठोठावला आहे.

वित्तीय सेवांच्या आऊटसोर्सिंगमधील जोखीम व्यवस्थापन आणि आचारसंहिता संबंधित काही सूचनांचे पालन न केल्यामुळे बँकेवर हा दंड ठोठावण्यात आला आहे. आरबीआयने युनियन बँक ऑफ इंडियाला १.०६ कोटी रुपयांचा दंड ठोठावला आहे. युनियन बँकेला नो युवर कस्टमरशी (केवायसी) संबंधित काही नियमांचे पालन न केल्यामुळे आणि इतर कारणांमुळे हा दंड ठोठावण्यात आला आहे.

कोणत्या आहेत कंपन्या?

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने मुथूट हाऊसिंग फायनान्सला ५ लाख रुपयांचा दंड ठोठावला आहे. नॉन-बँकिंग वित्तीय कंपन्या गृहनिर्माण वित्त कंपन्या (रिझर्व्ह बँक)सूचना, २०२१ च्या काही तरतुदींचे पालन न केल्याबद्दल कंपनीवर हा दंड ठोठावण्यात आला आहे. निडो होम फायनान्स लिमिटेड आणि अशोका विनियोग लिमिटेडलाही दंड ठोठावण्यात आला असून आरबीआयने ५ लाख रुपयांचा दंड ठोठावला आहे. तर आरबीआयने अशोका विनियोग लिमिटेड कंपनीला ३.१ लाख रुपयांचा दंड ठोठावला आहे. आरबीआयने म्हटले आहे की आर्थिक व्यवहारांशी संबंधित नियमांचे पालन न केल्याबद्दल या दोन कंपन्यांवर कारवाई करण्यात आली आहे.

# हिंडेनबर्गचा अहवाल विरोधकांच्या पिपाण्या

हिंडेनबर्ग अहवालात अदानी यांच्या समूहाचा संबंध असल्याच्या आरोपांनी पुन्हा खळबळ निर्माण झाली आहे. हिंडेनबर्ग यांच्या दाव्यानंतर त्यांच्या अहवालात गेल्या दोन वर्षांपूर्वीही असाच आरोप केला होता आणि त्यानंतर अदानी समूहाचे शेअर्स कोसळले होते. सेबीच्या अध्यक्षा माधवी बूच यांनी हिंडेनबर्गचे आरोप फेटाळून लावले आहेत आणि त्याचवेळी हे आरोप म्हणजे निराधार आणि चारित्र्यहिनाचा प्रयास असल्याचे म्हटले आहे. हे आरोप म्हणजे कोणत्याही सच्चाईपासून अलिप्त असल्याचे त्यांनी म्हटले आहे. वास्तवात हिंडेनबर्गचा आरोप होता की, बूच आणि त्यांचे पती धवल बूच यांचा अदानी मनी सायफनिंग घोटाळ्यात वापरला गेलेला पैशाचा म्हणजे ऑफशोअर हिस्सेदारीत सहभाग होता.

बूच पती-पत्नींनी म्हटले आहे की, आमच्यावर केले गेलेले आरोप हे निराधार तर आहेतच, पण आमचे आतापर्यंतचे पुस्तक हे उघड्या पुस्तकासारखे आहे. आम्हाला कोणतीही वित्तीय कागदपत्रे दाखवण्यात कसलीही अडचण नाही. इतका सुस्पष्ट खुलासा केल्यानंतरही हिंडेनबर्ग यांच्या आरोपांचा आधार घेऊन भारतातील विरोधी पक्ष या विषयावर बवाल माजवत आहेत याचे कारण सुस्पष्ट आहे. ते म्हणजे हिंडेनबर्ग यांच्या आरोपांचा आधार घेऊन त्यांना पंतप्रधान मोदी आणि अदानी यांना लक्ष्य करायचे आहे.

गेल्या १०ऑगस्टला हिंडेनबर्ग यांच्याकडून आरोप केला गेला की, माधवी बूच यांनी अदानी सायफनिंग स्कॅंडलमध्ये वापरल्या गेलेल्या पैशात हिस्सेदारी होती. अदानी यांच्याशी संबंध असल्यामुळे सेबी या प्रकरणी काहीही कारवाई करण्यास तयार नव्हता. पण हे झाले आरोप-प्रत्यारोपांचे. पण भारताचे यात नुकसान झाले आहे ते अभूतपूर्व आहे. हिंडेनबर्ग कायम भारताविरोधात आणि विशेषतः मोदी सरकारविरोधात आरोप करण्यात पुढे असतो. कारण उघड आहे, ते म्हणजे त्यांना कोणत्याही परिस्थितीत मोदी सरकारला बदनाम करायचे आहे. त्यामुळे मोदी यांना बदनाम करून कशी तरी त्यांची प्रतिमा खराब करायची हा देशातील विरोधी पक्षांचा प्रबळ असा अजेंडा आहे.

पण देशातील जनता सूज्ञ आहे आणि ती अशा गैरप्रकार करणाऱ्यांच्या धोक्यात येणार नाही, असा विश्वास आहे. आता हिंडेनबर्ग या शॉर्ट सेलर कंपनीने आपल्या तोफा पुन्हा अदानी आणि त्याद्वारे मोदी यांच्याविरोधात डागण्यास सुरुवात केली आहे. यावेळी त्याचे लक्ष्य सेबीच्या अध्यक्षा माधवी बूच आहेत. बूच दांपत्यांवर केलेला आरोप हा भडकवणारा आणि दिशाभूल करणारा आहे.

गेल्या जानेवारीत सर्वोच्च न्यायालयाने सेबी या प्रकरणाची व्यापक आणि सर्वसमावेशक चौकशी करत आहे आणि त्यांच्या चौकशीतून जे सत्य येईल ते योग्य असेल असा निर्वाळा दिला होता. पण तरीही आताही या प्रकरणी पुन्हा वेगळी जेपीसी नेमण्याची मागणी करणे हे विरोधकांच्या षडयंत्राचा वास येणारे आहे. त्याच वेळेस सर्वोच्च न्यायालयाने असेही स्पष्ट केले होते की, विशेष चौकशी पथकाकडे या प्रकरणाची चौकशी देण्याची काहीच गरज नाही. तरीही भारतातील विरोधक या प्रकरणाचे भांडवल करून मोदी सरकारविरोधात मुद्दा उपस्थित करण्यासाठी त्याची ढाल म्हणून उपयोग करत आहेत. हे त्यांच्या क्षुद्रपणाचे निदर्शक आहे. हिंडेनबर्ग यांनी आरोप केला आहे की, बूच दांपत्यांनी आपल्याकडील कथित हिस्सेदारीच्या रकमेचा विनियोग करून, त्याचा उपयोग करून अदानी समूहात पैशाची हेराफेरी केली. पण या आरोप-प्रत्यारोपांमध्ये भारतातील विरोधी पक्षांची गोची झाली आहे. कारण त्यांना हे नक्की काय प्रकरण आहे तेच समजत नाही. त्यामुळे त्यांना नेहमीप्रमाणे मोदी यांना शिव्या घालायच्या पण त्या कशामुळे हे समजत नाही.

बूच दांपत्यांचा आरोप खरा आहे की, सेबीच्या विश्वासार्हतेवरच हिंडेनबर्ग आरोप करत आहे. त्याविरोधात सर्व पक्षांनी एकत्र येऊन लढा द्यायला हवा, पण विरोधी मात्र मोदी यांच्या द्वेषाने पछाडले आहेत, त्यामुळे ते एक होऊ शकत नाहीत. खरी गोष्ट अशी आहे की, जितके मोठे उद्योग समूह तितके त्यातील घोटाळे मोठे असे चित्र देशात तयार झाले आहे. हिंडेनबर्ग त्याला अपवाद नाही. एकीकडे सचोटीने उद्योग करून देशाला अभिमान वाटावा अशी कामगिरी करणारे काही उद्योग समूह देशात असताना अल्पावधीत पुढे जाण्यासाठी काहीही मार्ग वापरणारे उद्योग समूह आहेत. त्यापैकीच एक आहे हिंडेनबर्ग.

हिंडेनबर्गने यावेळी थेट सेबीमध्ये व्हिसलब्लोअर असलेल्या सेबीवर हल्ला बोल केला आहे. हे निश्चितच भारतासाठी वाईट आणि खेदजनक आहे. माधवी बूच यांनी अदानी समूहावर कारवाई केली नाही कारण त्यांचे त्यात हितसंबंध दडले आहेत, असा आरोप हिंडेनबर्ग यांचा आहे. बूच यांनी तो फेटाळला आहे हे खरे आहे. मागेही अदानी समूहावर हिंडेनबर्गने आरोप केले तेव्हा त्या उद्योगाचे शेअर्स कोसळले होते आणि त्यांचा एक व्यवहार झाला नव्हता. पण आताही तसेच करायचे हिंडेनबर्गच्या मनात होते. पण तसे काही यंदा होणार नाही. या प्रकरणाची चौकशी झाली मात्र पुढे काहीच निष्पन्न झाले नाही. तेव्हा केवळ प्रसिद्धी मिळवण्यासाठी मोठे उद्योग समूह असा गैरप्रकार करतात हे समोर आले होते. तेव्हा काहीच झाले नाही म्हणून हा दुसरा धक्का देण्यात आला असावा असे मानण्यास जागा आहे. कारण यंदा विरोधी पक्षांची स्थिती पूर्वीपेक्षा जास्त प्रबळ आहे आणि काँग्रेस आता जवळपास शंभर लोकसभेच्या जागा घेऊन आहेत. त्यामुळे राहुल गांधी आणि विरोधी पक्ष हे ताकदवान झाल्याचे समजत आहेत. पण त्यांनी कितीही ताकदवान झाल्याच्या गमजा केल्या तरीही विरोधी पक्षांना हिंडेनबर्गचा भस्मासूर गिळंकृत केल्याशिवाय राहणार नाही. यात खरे म्हणजे पहिल्या वेळेसच परिस्थिती सरकारने समोर आणून खरे काय ते लोकांसमोर ठेवले असते, तर हे सारेच प्रकरण पुढे टाळता आले असते.

# आबलोलीच्या ज्ञानदा दिपक रेपाळ हिचा आमसभेत आम.भास्करशेठ जाधव यांनी केला गौरव..!

आबलोली

(संदेश कदम)

गुहागर तालुक्यातील चंद्रकांत बाईत विद्यालयातील कु.ज्ञानदा दिपक रेपाळ हिने इयत्ता १२ वी परिक्षेत विज्ञान शाखेतून गुहागर तालुक्यात




प्रथम क्रमांक पटकावला याबद्दल गुहागर विधानसभा मतदारसंघाचे कार्यसम्राट आमदार श्री.भास्करशेठ जाधव यांनी आमसभेत लोकशिक्षण मंडळ आबलोलीचे कार्याध्यक्ष व शिवसेनेचे तालुकाप्रमुख श्री.सचिनशेठ बाबत आणि मान्यवरांच्या व शासकीय अधिका-यांच्या उपस्थितीत कु.ज्ञानदा दिपक रेपाळ हिचा गौरव करुन तीला शुभेच्छा दिल्या

# कर्जत डेक्कन जिमखाना परिसरातील बेकायदेशीर, वाहनांवर कारवाई करण्याची मागणी



कर्जत: (जयेश जाधव) कर्जत शहरामध्ये वाढते नागरिकरण होत असल्याकारणाने कर्जत नगरपरिषदेमध्ये लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. तसेच कर्जत शहरामधील पार्किंगची समस्या दिवसेंदिवस बिकट होत चालली आहे. टू-व्हिलर, फोर व्हिलर पार्किंगसाठी जागा उरत नसल्याकारणाने पि.डब्यु.डि. ऑफिस कर्जत ते युको बँकच्या दरम्यानच्या रस्त्याला व छत्रपती शिवाजी महाराज स्मारक ते स्टेशनपर्यंतच्या रस्त्याला मोठ्या प्रमाणात रिक्षा, टू-व्हिलर, फोर व्हिलरचे पार्किंग केले जाते. शनिवार रविवारी लोकांना चालण्यासाठी देखील जागा नसते. अशा प्रकारे गाड्या पार्किंग केल्याने त्यांच्यावर बंधन राहिलेले नाही अशा बेशिस्त अनधिकृत पार्किंग करीत असलेल्या वाहनांवर कारवाई करण्याची मागणीचे लेखी निवेदन राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार पक्ष)कर्जत शहराध्यक्ष ॲड भाऊसाहेब मोरे यांनी कर्जत नगरपरिषद, पोलिस ठाणे कर्जत यांना देण्यात आले आहे.

कर्जत नगरपरिषदेने संबंधीत पार्किंगची व्यवस्था गाड्या लावण्यासाठी योग्य ठिकाण उपलब्ध करुन द्यावे, त्यामुळे डेक्कन जिमखान्यामधील लोकांना रस्ते मोकळे करुन देण्यास हातभार लावावा. तरी ह्या समस्येबाबत आपण शनिवार-रविवारी दोन ट्रॅफिक पोलिसांची नियुक्ती करुन होणाऱ्या गाड्यांच्या गर्दीला आवर घालावा, ही स्थानिक नागरिकांकडून तसेच राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाकडून मागणी केली जात आहे.

# व्हेज भाज्यांसोबत मटण-मासेही महागले

विधानसभा निवडणुकीआधी पुन्हा एकदा महागाईचा भडका उडाला आहे. घरगुती त्यामुळे आवक कमी झाली. तर श्रावणात अनेकजण मासे-मटण खाणे टाळत असल्याने



गॅस सिलिंडरच्या दरात कोणतेही बदल करण्यात आले नाहीत. तर दुसरीकडे आता श्रावण सुरू असताना भाज्यांसोबत मटण-मासेही महाग झाले आहेत.

त्यामुळे गृहिणींचे बजेट कोलमडले आहे. श्रावणात पुन्हा एकदा ग्राहकांच्या खिशाला चांगलीच कात्री लागणार आहे.

महागाईचा कहर सुरूच असून सर्वच भाज्यांनी शंभरी गाठली आहे. डाळी, मटण, मासे देखील महाग झाले आहेत. बदलत्या हवामानामुळे टोमॅटो, कोबी, मेथीसह इतर भाजीपाला रोगाच्या विळख्यात आले आहेत भाज्यांची मागणी मोठ्या प्रमाणात वाढली आहे.

मनमाड, मालेगावसह नाशिक जिल्ह्यातील बाजार समित्यांसोबत किरकोळ बाजारात देखील जवळपास सर्वच भाजीपाल्याने प्रति किलो भावात शंभरी गाठली असून भाजीपाल्यासोबत डाळी, चिकन, मटण, मासेही महाग झाले आहेत. त्यामुळे महागाईने नागरिकांचे कंबरडे मोडले असू गगनाला भिडलेल्या महागाईचा सर्वांत जास्त फटका गोरगरीब आणि मध्यमवर्गीयांना बसत आहे.

या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

दैनिक
# सूर्योदय
बुधवार १४ ऑगस्ट २०२४



या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

## संत निरंकारी मिशन खरसई ब्रांच गोरेगावं रायगड विभागाच्या वतीने वडगांव (वडघर)या ठिकाणी २२५ झाडे लावून वृक्षारोपण करण्यात आले.

नांदवी पुरार : नितेश पुरारकर

जगभरात मोठया संख्येने होत असलेल्या वृक्षतोडीमुळे ऑक्सिजन चे प्रमाण कमी होऊन दूषित वातावरण अर्थात (प्रदूषण) होत असल्याने विश्वातील मानव तसेच इतर जीव घटकांच्या कल्याणासाठी सदगुरु माता सुदीक्षाजी महाराज व पू.निरंकारी राजपिता रमितजी यांचे दिव्य मार्गदर्शन व आर्शिवादाने संत निरंकारी मिशनच्या वतीने पर्यावरण संरक्षणाच्या उद्देशाने २०२१ साली 'वननेस वन' अर्थात लघुवन (समूह वृक्षारोपण) नामक मेगा परियोजना सुरु करण्यात आली.




सदर उपक्रमाच्या चौथ्या टप्प्याचे आयोजन देशभरातील ६०० हून अधिक ठिकाणी रविवारी (११ऑगस्ट) रोजी सकाळी ८ ते १२ या वेळेत करण्यात आले.

सद्गुरु माता सुदीक्षाजी महाराज व पू.निरंकारी राजपिता रमितजी यांच्या पावन पवित्र आदेशानुसार संत निरंकारी मिशन खरसई ब्रांच गोरेगाव रायगड विभाग. वडगांव (वडघर)येथे झोनल प्रमुख- प्रकाश जी म्हात्रे तसेच गोरेगाव विभागातील मिलिंद गांधी जी यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व सेवादल महात्मा. बेहनजी तसेच शिरवली. हरकोल. पुरार. गोवेले कोंड आणि वडघर सादसंगतने २२५ झाडे लावून वृक्षारोपण केले. झाडांचे पुढील तीन वर्षे संगोपन करून रोपट्याचे मोठया वृक्षात रूपांतर करण्याचे प्रण घेतले आहे.

## नेने महाविद्यालयात स्वच्छता मोहिम संपन्न!

अलिबाग प्रतिनिधी
राजेश बाष्टे:

दि.१३ऑगस्ट पेण एज्यूकेशन सो. च्या भाऊसाहेब नेने महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आंतरराष्ट्रीय युवा दिन आणि हर घर तिरंगा मोहिमेचे औचित्य साधुन रविवार, दि. ११ ऑगस्ट रोजी स्वच्छता मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते.

सदर कार्यक्रमासाठी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. यु. ए. खाडिलकर, रा. से. यो. चे कार्यक्रम अधिकारी डॉ. टी. डी. माळवे,डॉ.एस.डी.लकडे , डॉ. एस. ए. पितळे, विविध शाखांचे मान्यवर प्राध्यापक आणि रा.से.यो चे स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ यु. ए. खाडिलकर यांनी युवा दिनानिमित्त विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत स्वच्छता मोहीमेत हिरीरीने सहभागी झाल्याबद्दल विद्यार्थ्यांचे




कौतुक केले आणि त्यांना समाजहितासाठी सदैव दक्ष राहण्याचे आवाहन केले. तर रा. से. यो. चे कार्यक्रम अधिकारी डॉ. टी. डी. माळवे यांनी युवा पिढी ही देशाची ताकद असुन या तरुणाईच्या कार्यकर्तृत्वावर देशाचे उज्वल भविष्य अवलंबून असल्याने तरूणाईने यासाठी आपापल्या परीने प्रामाणिक प्रयत्न करावेत, असे मत व्यक्त केले. ङ यानंतर स्वच्छतेची शपथ घेऊन प्रत्यक्ष स्वच्छता मोहिमेला प्रारंभ झाला. सदर मोहिमेत स्वयंस्फुर्तीने सहभागी होत रा. से. यो. च्या स्वयंसेवकांनी महाविद्यालयातील विविध वर्गखोल्या, व्हरांडा आणि सर्व परिसराची स्वच्छता केली.यानंतर जमा झालेल्या कचर्याची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावण्यात आली. स्वच्छता समाप्त झाल्यानंतर विद्यार्थ्यांना राष्ट्रीय सेवा योजना विभागाकडून अल्पोपहार देण्यात आला.

तऱ्हेने नेने महाविद्यालयात युवा दिन आणि हर घर तिरंगा मोहिम आगळयावेगळया पद्धतीने राबविण्यात आली.या संपूर्ण कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन विद्यार्थ्यांनी रा. से. यो. चे कार्यक्रम अधिकारी डॉ. माळवे,डॉ.लकडे, डॉ. पितळे यांच्या मार्गदर्शनाखाली केले.

### वाचक विचार
### बालकवींचे स्मारक केव्हां !

**निसर्ग कवितांनी जनमनाला आनंद देणारे, बालकवी उर्फ त्र्यंबक बापूजी ठोंबरे यांचे धरणगाव या जन्मगावी स्मारक व्हावे अशी सुमारे दहा वर्षांपूर्वी त्यांच्या जयंतीनिमित्ताने साहित्यिक, साहित्य प्रेमींची इच्छा, संकल्पना मांडण्यात आली. परंतु या प्रदीर्घ कालावधीतही दुर्दैवाने आजवर स्मारक पूर्णत्वास मात्र गेलेले नाही किंबहुना ते दुर्लक्षित राहिलेय याची खंत वाटते. निधी अभावी अथवा अन्य कारणास्तव बालकवींचे रखडलेले स्मारक शक्य तितका लवकर संबंधितांकडून पूर्णत्वास जाऊन देखण्या स्वरूपात उभे रहावे.**

**विश्वनाथ पंडित**
**ठाणे**

## सार्वजनिक वाचनालय अलिबाग तर्फे ग्रंथपाल दिनानिमित्त ग्रंथालय चळवळीचे जनक डॉ. एस.आर. रंगनाथन यांना अभिवादन

अलिबाग प्रतिनिधी
राजेश बाष्टे:

दि.१२ऑगस्ट भारतीय ग्रंथालय चळवळीचे जनक डॉ. एस. आर.रंगनाथन यांच्या जयंतीनिमित्त सार्वजनिक वाचनालय आणि जिल्हा ग्रंथालय अलिबाग येथे भावपूर्ण आदरांजली अर्पण करण्यात आली. यावेळी सार्वजनिक वाचनालय आणि जिल्हा ग्रंथालयाचे जेष्ठ संचालक नागेश कुळकर्णी यांच्या हस्ते डॉ. एस.आर. रंगनाथन यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आले.यावेळी सार्वजनिक वाचनालय आणि जिल्हा ग्रंथालय अलिबागचे ग्रंथपाल भालचंद्र वर्तक, सहाय्यक ग्रंथपाल सौ.रजिता माळवी, प्रकाश टेंबुलकर, अभय हातणकर,हेमंत राऊत अमित धुमाळ,सौ.अर्चना माळवी तसेच वाचकवर्ग या वेळी बहुसंख्येने उपस्थित होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून




बोलतांना जेष्ठ संचालक ग्रंथमित्र नागेश कुळकर्णी यांनी डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या ग्रंथालय चळवळीतील योगदानाबद्दल सांगितले की,ग्रंथालयाच्या विकासात डॉ. रंगनाथन यांचा फार मोठा वाटा आहे.देशातील सर्वसामान्यांना ज्ञानाची कवाडे विनामूल्य खुली करण्याचा विचार डॉ रंगनाथन यांनी रुजविला,नंतर तो जोपासण्यासाठी आपले संपूर्ण आयुष्य झिजवले.ङ यावेळी सार्वजनिक वाचनालय आणि अलिबाग ग्रंथालयाचे ग्रंथपाल तसेच महाराष्ट्र शासनाचा ग्रंथमित्र पुरस्कार प्राप्त भालचंद्र वर्तक, सहाय्यक ग्रंथपाल सौ.रजिता माळवी यांना यावेळी सन्मानित करण्यात आले.



**कुंबळे गावचे समाज सेवक अखतर कमाने यांनी धाडस दाखवले आणि गावामध्ये मोहल्या तील वावेकर याचे घरी प्रवेश केलेल्या सात फुटी नागाला पकडुन धाडसाने बाहेर काढले. यांचे या धाडसाचे कुंबळे गावचे ग्रामस्थान कडुन कौतुक करण्यात आला.**

## सुधागड तालुक्यात महसूल संयुक्त दिन साजरा एक हात मदतीचा दिव्यांगांच्या कल्याणाचा

रायगड जिल्हा
उत्तर प्रतिनिधी
मंगेश यादव:

सुधागड तालुक्यात संयुक्त पंधरवडा दिन दिनांक १२ ऑगस्ट रोजी साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात दिव्यांगांसाठी दिव्यांग तपासणी व मार्गदर्शन शिबिर तसेच दिव्यांग विविध योजनांचे आयोजन करण्यात आले होते. महसूल सप्ताह अंतर्गत एक हात मदतीचा दिव्यांग यांच्या कल्याणाचा संयुक्त उपक्रम यावेळी राबविण्यात आला. दिव्यांग्यांची मोफत तपासणी करून मोफत प्रमाणपत्र देण्यात आले. हजारो दिव्यांग यांनी या शिबिराचा लाभ घेतला. यावेळी तहसीलदार उत्तम कुंभार, नायब तहसीलदार ज्ञानेश्वर अडसुळे,




निवासी तहसीलदार भारत फुलपगारे, तहसील कर्मचारी, जिल्हा सामान्य रुग्णालय अलिबाग कर्मचारी, श्री साईनाथ जी पवार राज्याध्यक्ष कर्मचारी महाराष्ट्र संघटना प्रशांत काळे कनिष्ठ सहाय्यक समाज कल्याण विभाग, पंचायत समिती कार्यालय सर्व अधिकारी, कर्मचारी, आशा वर्कर, प्राथमिक आरोग्य केंद्र सुधागड डॉक्टर मढवी, उप आरोग्य केंद्रातील डॉक्टर, कर्मचारी तसेच आदर्श गाव व इंडिया व एम जी एल विकास नाक, कान , घसा आरोग्य तपासणी व मार्गदर्शन केले. अलिबाग, सुधागड शासकीय अधिकारी कर्मचारी यामध्ये काम करणारे संस्थापक अध्यक्ष शैलेश रमेश सोनकर जागृती अपंग कल्याणकारी संस्था सुधागड पाली यांच्या सहकार्यातून हा दिव्यांगाचा प्रमाणपत्र व उपकरणांचा वाटप करण्यात आला. हे कार्यक्रम भक्त निवास क्रमांक एक येथे आयोजित करण्यात आले होते. वरील समस्त अधिकारी व कर्मचारी यांच्या हातभार व मदतीने महसूल पंधरवडा संयुक्त दिनी अपंग कल्याणकारी संस्था सुधागड पाली यांच्या संयुक्त विद्यमाने सुधागड तालुक्यातील ग्रामपंचायत कार्यक्षेत्रातील बहुसंख्य दिव्यांग बांधव यावेळी उपस्थित राहून यांनी या शिबिराचा लाभ घेतला.

## रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाच्या रिपब्लिकन सोशल मिडिया व आयटी सेल गुहागर तालुका अध्यक्षपदी आबलोलीचे पत्रकार श्री.संदेश कदम यांची नियुक्ती..!

आबलोली (प्रतिनिधी)

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) या पक्षाच्या रिपब्लिकन सोशल मिडिया व आयटी सेल गुहागर तालुका अध्यक्षपदी आबलोलीचे पत्रकार श्री.संदेश तुकाराम कदम यांची नियुक्ती करण्यात आली असून तसे नियुक्ती पत्र पत्रकार श्री.संदेश कदम यांना पाठवीण्यात आले आहे.या पत्रात असे म्हटले आहे की ,पत्रकार संदेश कदम आपल्याला हे कळवीताना आम्हांला आनंद होत आहे की, रिपब्लिकन सोशल मिडिया व आयटी सेलच्या गुहागर तालुका अध्यक्षपदी आपली नियुक्ती करण्यात येत आहे.आपल्या कडून पक्षाला असलेल्या अपेक्षा आपण निश्चितच पूर्ण कराल ह्याचा आम्हांला पूर्ण विश्वास आहे.राष्ट्रीय अध्यक्ष नाम.डॉ.रामदास आठवले साहेबांच्या नेतृत्वाखाली आपण आपल्या नव्या भूमिकेत उत्कृष्ट योगदान देऊन,पक्ष संघटना बळकट कराल ह्या विश्वासासह आंम्ही आपल्याला मन:पुर्वक शुभेच्छा देतो असे



लेखी नियुक्ती पत्र आयटी सेलचे रत्नागिरी जिल्हा अध्यक्ष श्री.प्रशितोष कदम यांच्या सहिने पत्रकार श्री.संदेश कदम यांना पाठवीण्यात आले असून पत्रकार श्री.संदेश कदम यांचेवर रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया तालुका गुहागर या राजकीय पक्षांचे वतीने तसेच गुहागर तालुक्यातून सर्वच समाजातील सामाजिक, धार्मिक संघटनांच्या कार्यकर्त्यांकडून आणि विविध पक्षांच्या राजकीय कार्यकर्त्यांकडून व आबलोली पंचक्रोशीतून अभिनंदनाचा वर्षाव करण्यात येत असून पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात येत आहेत

मुंबई विभागीय कार्यालय पत्ता : बी विंग / फ्लॅट नंबर ३०९ , मारुती दर्शन, हनुमान चौक, लोकमान्य टिळक रोड, मुलुंड पूर्व, मुंबई – ४०००८१– अनुप फंड (आवृत्ती संपादक), निखिल गोळे (आवृत्ती सहसंपादक) , नयानिष गोळे : (आवृत्ती कार्यकारी संपादक)

हे पत्र मालक, प्रकाशक संपादक गंगाधर सिताराम काळकुटे यांनी माऊली ऑफसेट प्रिंटर, एम.एस.ई.बी. ऑफीसजवळ, माळीवेस बीड– ४३११२२ येथे छापून दैनिक महाराष्ट्र सूर्योदय, हॉटेल रायगड, जिल्हाधिकारी ऑफीससमोर, नगर रोड, बीड ४३११२२ येथे प्रकाशित केले. मुख्य कार्यालयः जिल्हाधिकारी कार्यालया समोर, नगर रोड, बीड मुख्य संपादकः गंगाधर काळकुटे मो. ९८५४८९८९८९ , अंकामधील छापून आलेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (वाद बीड न्यायकक्षेत )